दै. पुण्य नगरी दि. २५/०६/२०२२

# चोरट्यांची टोळी गजाआड; पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड/ प्रतिनिधी**

शहर व जिल्ह्यात चोऱ्या, घरफोड्या, दुचाकी पळविण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी पोलिस ठाण्यांना गुन्ह्यांचा छडा लावण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पोलिसांनी चोरांची टोळी पकडली असून पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गेल्या काही महिन्यांत शहर व जिल्ह्यातील विविध भागात मोठ्या प्रमाणावर घरफोड्या, दुचाकी चोऱ्या, घरे, दुकानांमध्ये चोऱ्या अशा घटना वाढल्या आहेत. त्यामुळे पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अपर पोलीस अधीक्षक नीलेश मोरे, शहर उपविभागीय अधिकारी चंद्रसेन देशमुख यांनी सर्व पोलिस ठाण्यांना गुन्ह्यांचा छडा लावा असे आदेश दिले होते. त्यानुसार भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे प्रमुख स.पो.नि.किनगे व सहकारी १४ जून रोजी गस्तीवर होते. तेव्हा युनिकॉर्न दुचाकीवर तिघेजण संशयास्पदरित्या फिरत असल्याचे आढळून आले. त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी लखन भीमराव ईरंडकर (२२) रा. बाभुळगाव कारखाना ता. वसमत, पिराजी धुरपत पवार (२७) बडूरवाडा वसमत, चांदू सुग्रीव जाधव २९ रा.हयातनगर वसमत अशी आपली नावे सांगितली.

त्यांची अधिक चौकशी केली असता साथीदार मोहम्मद मोबीन मोहम्मद जिलानी ३० रा. लेबरकॉलनी नांदेड, अशरफ खान परवेज खान २५ रा.तेहरानगर नांदेड व भीमा नरसिंग वाघमारे ३० रा.ओंकारेश्वरनगर तरोडा बु. नांदेड यांच्यासोबत अनेक गुन्हे केल्याची कबुली दिली.

या सर्व आरोपींकडून भाग्यनगर पोलीस ठाण्यात दाखल गुरनं १९३/२२ कलम ४५४,४५७,३८० मधील सोन्याचे दागिने अंदाजे ९९ हजार ५० रुपये किंमत, भाग्यनगर पोलीस ठाण्यात दाखल गुरनं गु.र.नं. १७९/२२ कलम ४५४,४५७,३८० मधील सोन्याचे दागिने १ तोळा, १० तोळे चांदीचे दागिने किंमत ६० हजार रुपये, हदगाव पोलीस ठाण्यात गुरनं १६२/२२ कलम ३७९ मधील युनिकॉर्न दुचाकी किंमत १ लाख रुपये, वजिराबाद पोलीस ठाण्यात दाखल गुरनं ११३/२२ कलम ३७९ मधील स्प्लेंडर दुचाकी किंमत २० हजार रुपये, शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल गुरनं १७८/२२ कलम ४५४,४५७,३८० अशा गुन्ह्यांची कबुली **(पान ४ वर..)**